# शिक्षकेतर सेवक संघटना बैठकीचे इतिवृत्त दि. १०/१०/२०१९

| अ.क. | सर्वसाधारण विषय | करावयाच्या कार्यवाहीचा तपशील | कार्यवाही कोणत्या स्तरावर | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | मागील सभेचे प्रोसिडिंग वाचून कायम करणे. | -- | -- | -- |
| २ | मागील सभेत ठरलेप्रमाणे लिपिक प्रशिक्षण वर्ग आयोजनाबाबत अद्यापही काही कार्यवाही झालेली नाही. | मागील वर्षी झालेल्या संघटना बैठकीमध्ये सर्व शिक्षणाधिकारी यांना एक दिवसीय लिपिक प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. परंतु सांगली जिल्हा वगळता कोणत्याही शिक्षणाधिकारी कार्यालयाकडून प्रशिक्षण सर्व आयोजित करण्यात आले नाही.<br>सर्व शिक्षणाधिकारी यांनी वेळापत्रक तयार करुन प्रशिक्षणाबाबत लिपिकांचे एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करुन त्यांना मार्गदर्शन करावे. | सर्व शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| ३ | मूल्यांकनामध्ये अनुदान पात्र शाळांतील विनाअनुदानीत शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वैयक्तिक मान्यता बाबत. | काही शाळांमध्ये एकही लिपिक व शिपाई कार्यरत नाहीत. त्यामुळे दैनंदीन कामकाजामध्ये अडचणी निर्माण येत असलेबाबत संघटनेकडून नमूद करण्यात आले.<br>ही धोरणात्मक बाब असल्यामुळे संघटनेकडून कार्यालयास सविस्तर निवेदन सादर करावे ते कार्यालयामार्फत शासनास सादर करण्यात येईल. तसेच संघटनांच्या होणाऱ्या राज्यस्तरीय बैठकीमध्ये सुध्दा हा विषय घ्यावा. | शासन स्तरावर | -- |
| ४ | ऑक्टोबर २०१५ मधील सभेत ठरल्याप्रमाणे शिक्षकेतर पदोन्नतीस मान्यता मिळत नसलेबाबत | शासनाकडून शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्याबाबतीत सुधारित आकृतीबंधाचा निर्णय प्रलंबित असल्यामुळे सद्यस्थितीत शिक्षकेतर पदोन्नतीबाबत निर्णय घेता येणार नाही. | शासन स्तरावर | -- |
| ५ | शालार्थ आय.डी. प्रलंबित प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत. | सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शालार्थ आयडीचे प्रस्ताव बऱ्याच कालावधीपासून प्रलंबित असल्याचे संघटनेकडून सांगण्यात आले.<br>सद्यस्थितीत विधानसभा निवडणूकाचे कामकाज सुरु असल्या बराच अधिकरी वर्ग निवडणूकीच्या कामकाजात व्यस्त आहे विधानसभेचे कामकाज संपताच विभागस्तरावर शालार्थ प्रस्तावांच्या तपासणीसाठी गठीत केलेल्या समितीची बैठक आयोजित करुन शालार्थ आयडी प्रस्ताव निकाली काढण्यात येतील.<br>सिंधुदुर्ग जिल्ह्यात झालेल्या तक्रारीमुळे शालार्थ आयडी प्रस्तावांबाबत | शिक्षण उपसंचालक स्तरावर | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | निर्णय घेण्यास विलंब होत आहे. तक्रारी असणाऱ्या प्रकरणांची चौकशी पूर्ण झाली असून त्याबाबत लवकरच निर्णय देण्यात येतील. | | |
| ६ | सर्व ऑनलाईन कामकाजाबाबत तालुका निहाय तज्ञ मार्गदर्शक नियुक्तीबाबत. | सर्व शिक्षणाधिकारी यांनी याबाबत नियोजन करावे. तसेच लिपीक प्रशिक्षण शिबीरामध्ये ऑनलाईन कामकाजाबाबचा विषय घ्यावा. | शिक्षणधिकारी स्तरावर | -- |
| ७ | शिपाई कर्मचारी रात्रपाळीबाबत. | काही शाळा रात्रपाळीसाठी शिपाई कर्मचाऱ्यांची नियुक्ती करतात. परंतु, एस.एस. कोड मध्ये रात्रपाळीच्या कामाबाबतचा उल्लेख नसल्यामुळे अशा प्रकारचे आदेश काढण्यात येवू नयेत अशी मागणी संघटनेकडून करण्यात आली. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प.सातारा यांना याबाबत संघटनेकडून निवेदन देखील देण्यात आले आहे. परंतु, शिक्षणाधिकारी यांचेकडून शाळा मुख्याध्यापक यांना अद्याप आदेश देण्यात आलेले नाहीत.<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प.सातारा यांनी शिपाई कर्मचाऱ्यांना रात्रपाळीची सक्ती न करण्याबाबत जिल्ह्यातील सर्व शाळा मुख्याध्यापक यांना लेखी सूचना निर्गमित कराव्यात. | शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प.सातारा | -- |
| ८ | उच्च माध्यमिक संलग्न माध्यमिक शाळा संच मान्यता दुरुस्ती करुन मिळणेबाबत. | संच मान्यता दुरुस्ती ही शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा.पुणे व एनआयसी, पुणे यांचेकडून करण्यात येते. | संचालनालय स्तरावर | -- |
| ९ | वरिष्ठ वेतनश्रेणी व कालबध्द पदोन्नती प्रस्तावास पूर्वीप्रमाणे मंजूरीचे अधिकारी लेखाधिकारी यांचेकडेच ठेणेबाबत २० जूलै २०१९ चे शासन निर्णयानुसार तक्रार निवारण समिती मध्ये सर्व घटकांना (शिक्षक/शिक्षकेतर) प्रतिनिधित्व मिळणेबाबत. | वरिष्ठ वेतनश्रेणी व कालबध्द पदोन्नती प्रस्तावाबाबत शासन निर्णय दि. २६ ऑगस्ट २०१९ नुसार कार्यवाही करावी.<br>दि. २० जूलै २०१९ चे शासन निर्णय च्या बाबतीमध्ये दि.०१/१०/२०१९ रोजी शासन शुध्दीपत्रक निर्गमित झाले असून शिक्षण उपसंचालक हे अध्यक्ष, शिक्षणाधिकारी हे सदस्य व सहा. शिक्षण संचालक हे सदस्य सचिव आहेत. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| १० | सर्व प्रस्तावांची सर्व विभागात विषयसूची (चेकलिस्ट) एकच असावी. | शाळांकडून शिक्षणाधिकारी कार्यालयामध्ये दाखल करण्यात येणाऱ्या बऱ्याच शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विविध सेवाविषयक प्रस्ताव त्रुटी असल्यामुळे बराच काळ प्रलंबित राहतात. संपूर्ण विभागामध्ये एकसुत्रता येण्याकरिता विभागस्तरावर शिक्षणाधिकारी कार्यालयात दाखल करण्यात येणाऱ्या विविध सेवाविषयक प्रस्तावांसोबत कोणकोणती कागदपत्रे असावीत याबाबत हस्तपुस्तीका तयार करण्यात यावी अशी मागणी संघटनेकडून करण्यात आली.<br>विभागस्तरावर अशाप्रकारची चेकलिस्ट तयार करण्यात आलेली आहे | शिक्षण उपसंचालक स्तरावर | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | व ती विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द देखील करण्यात आली असल्याचे शिक्षण उपसंचालक यांनी सांगितले.<br>जिल्हा शिक्षणाधिकारी कार्यालयातील प्रतिनिधी व जिल्हा संघटनेचे प्रतिनिधी यांनी एकत्र येवून पुनश्चः नव्याने एक हस्तपुस्तिका तयार करावी व ती विभागाच्या संकेतस्थळवर प्रसिध्द करण्याबाबत शिक्षण उपसंचालक यांनी सूचना दिल्या. | | |
| ११ | लिपिकांना मोबाईल वापरास परवानगी मिळणेबाबत. | -- | -- | -- |
| १२ | **ऐनवेळच्या विषयांवर चर्चा करणे.** | | | |
| ➢ | वेतनपडताळणी होणेबाबत तसेच ७ व्या वेतन आयोगाच्या वेतन निश्चितीबाबत | लेखाधिकारी यांचेकडून विभागामध्ये वेतन पडताळणी होत नसल्याबाबत सांगण्यात आले. विशेषतः लेखाधिकारी, सांगली यांचे कार्यपध्दतीबाबत गंभीर स्वरुपाच्या तक्रारी असल्याबाबत संघटनेकडून सांगण्यात आले.<br>लेखाधिकारी यांचेकडील प्रलबिंत असणाऱ्या विषयांबाबत सर्व लेखाधिकारी यांची आढावा बैठक आयोजित करुन त्यांना योग्य त्या सूचना निर्गमित करण्यात येणार असल्याचे शिक्षण उपसंचालक यांनी सांगितले. | शिक्षणउपसंचालक स्तरावर | -- |
| ➢ | **सर्वसाधारण सूचना :-** | | | |
| | संघटना अधिकृत असलेला पुरावे सादर करणे. | सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दि. ०२ जानेवारी २०१७ नुसार आपली संघटना अधिकृत असलेबाबचे पुरावे सादर करावे. अधिकृत असलेल्या संघटनेचीच बैठक पुढे आयोजित करण्यात येईल. | संघटना स्तरावर | -- |

(सत्यवान सोनवणे)
शिक्षण उपसंचालक
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर